**Deshonnati, P-2, Nov 7**

# ओरिएंट इलेक्ट्रिकच्या प्रिमियम फॅन्सचा पाया मजबूत होणार

*प्रतिनिधी/६ नोव्हेंबर*

**भविष्यात इशाऱ्यावर चालणार पंखे**

**आता नागपुरातही डिस्ट्रीब्युटर**

**नागपूर :** ओरिएंट फॅन्स या ओरिएंट इलेक्ट्रिकच्या मालकीच्या कंपनीकडून देशातील सर्वात मोठा बाजार असलेल्या महाराष्ट्रात आता विस्तार केला जात आहे. ओरिएंटचा तूर्त राज्यात असलेला बाजारातील १६ टक्के वाटा यावर्षी २० तर पुढील वर्षी तो २५ टक्क्यांपर्यंत नेण्याचा मानस कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि व्यवसाय प्रमुख अतुल जैन यांनी आज निवडक पत्रकारांशी चर्चेत बोलून दाखविला. महाराष्ट्र ही आमच्या सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक असून विदर्भातील नेटवर्क मजबूत करण्यासाठी आता डिस्ट्रीब्युटरची नेमणूक केली जात आहे. यामुळे ग्राहकांना अधिकाधिक उत्पादने लवकर मिळतील. सर्व्हिस मिळू शकेल असा आमचा विश्वास आहे. नाविण्यपूर्णता, कार्यक्षमता,



कामगिरी आणि डिझाईन्स याबाबतीत स्वतःचा दर्जा वाढविणे व स्वतःलाच आव्हान देणे याला आमचे प्राधान्य आहे. एअरोक्वाईट प्रिमियम सिलिंग फॅन्ससह आम्ही या क्षेत्रात आघाडीवर आहोत असेही त्यांनी स्पष्ट केले. भविष्यात डेकोरेटिव्ह, पॉवर सेव्हर इलेक्ट्रिक उत्पादनांकडे ग्राहकांचा कल लक्षात घेता आयओटी अर्थात इंटरनेट ऑफ थिंक्स या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अर्थात हाताच्या इशाऱ्याने पंखे चालू शकतील असे जागतिक पातळीवर संशोधन सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भारतीय क्रिकेटचा कर्णधार महेंद्रसिंग धोनी कंपनीचा ब्रँड ॲम्बसेडर आहे हे विशेष. कमी वीज लागणाऱ्या, रिमोट ब्रशलेस डिजीटल अर्थात बीएन्डसी प्रकारातील पंख्यांना चांगली मागणी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. फरिदाबाद, कोलकाता, गोहाटी येथील प्रकल्पांमधून महिन्याला ८ लाख पंख्यांची निर्मिती होत असल्याचे त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात स्पष्ट केले. तूर्तास १५० मॉडेल्सचे पंखे यात २५ ते ३० हाय सेलिंग फॅन्स ओरिएंटमार्फत बाजारात आहेत. आवाज कमी व हवा अधिक या श्रेणीतील एअरो डायनामिक डिझाईन्सना चांगली मागणी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. ६५ टक्के उत्पादने निर्यात होत असल्याचे सांगितले.